नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २७५ | Issue - 275 | वार शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ | Blow- Friday Date 21 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### पावणे नऊ लाखांची फसवणूक ; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) आठ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ ते २६ ऑगस्ट २०२० दरम्यान शिवाजी नगर तांडा ते दमाणी नगर येथे घडली. याप्रकरणी मनोज उद्धव घोडके (वय-३०,रा.९०,बी.भैरव कॉलनी,दमाणी नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अनिल वालचंद रजपूत,स्वप्नील अनिल रजपूत,कमल अनिल रजपूत व कुमार चव्हाण (रा.शिवाजीनगर,लमाण तांडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी संगनमताने कट करून अनिल रजपूत याने यांच्या मालकीची मौजे शिवाजीनगर ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर २७/१ अ पैकी वायव्य दिशेने ०.०५ आर क्षेत्राची विहिरीची जागा सचिन शंकरराव ठोकळ व सत्यविजय सचिन ठोकळे यांना सह दुय्यम निबंधक वर्ग २ सोलापूर उत्तर १ यांच्या कार्यालयातील दस्त क्रमांक ४०८/२०१९ दि.१९/०१/२०१९ अन्वये खरेदी दिली असताना त्या क्षेत्राची खरेदी फिर्यादीस बेकायदेशीर रित्या सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग दोन सोलापूर उत्तर २ यांच्या कार्यालयात दस्त क्रमांक २०२१/२०२० दि.२५ ऑगस्ट २०२० अन्वये देऊन फिर्यादी यांची ८ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोसई.शिंदे हे करीत आहेत.

# रेखा गुप्ता यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

## वित्त, महिला आणि बाल विकास खाते मुख्यमंत्र्यांकडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : दिल्लीत नवीन सरकारचा शपथविधी सोहळा आज पार पडला असून, दिल्लीचे उपराज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी रामलीला मैदानावर भाजपा आमदार रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली.

रेखा गुप्ता यांच्यानंतर, उपराज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी प्रवेश वर्मा, मनजिंदर सिंग सिरसा, कपिल मिश्रा, पंकज सिंग, आशिष सूद आणि रवींद्र इंद्राज यांना मंत्रीपदाची शपथ दिली. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर रेखा गुप्ता सचिवालयात पोहोचल्या आणि मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली. रेखा गुप्ता दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री आणि चौथ्या महिला मुख्यमंत्री बनल्या आहेत. रेखा दिल्लीच्या शालीमार बाग विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात.

दरम्यान, शपथविधीनंतर मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंत्रीमंडळाचे खातेवाटप केले आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी वित्त, नियोजन, महिला आणि बाल विकास यासह इतर मंत्र्यांना न दिलेली खाती त्यांच्याकडेच ठेवली आहेत. तर माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव करणाऱ्या परवेश वर्मा यांना सार्वजनिक बांधकाम, विधिमंडळ व्यवहार ही खाती देण्यात आली आहेत. दरम्यान गृह, नगरविकास आणि शिक्षण ही खाती आशिष सूद यांच्याकडे देण्यात आली आहेत.

दुसरीकडे काही वर्षांपूर्वी अकाली दलातून भाजपात आलेल्या सरदार मनजिंदर सिंग सिरसा यांना अन्न आणि पुरवठा खाते देण्यात आले आहे. रविंदर इंद्राज हे समाज कल्याण आणि सहकार खाते सांभाळणार आहेत. कपिल मिश्रा हे कायदा आणि न्याय, कामगार, कला आणि संस्कृती खात्याचे मंत्री असणार आहेत. डॉ. पंकज कुमार सिंह यांच्याकडे आरोग्य आणि कुटुंब कल्याण, वाहतूक आणि माहिती तंत्रज्ञान खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

दरम्यान आज दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशातील एनडीएचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांनीही हजेरी लावली होती. यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही समावेश होता. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीच्या भाजपा सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी सुमारे ५०,००० दिल्लीकरांनी रामलीला मैदानावर हजेरी लावली होती.

# भारतात २० लाखांहून अधिक मृत्यू वायू प्रदूषणामुळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जागतिक स्तरावर ८१ लाख मृत्यू वायू प्रदूषणामुळे होत असून त्यातील २५ टक्क्यांहून अधिक म्हणजेच २० लाखांहून अधिक मृत्यू भारतात होत असल्याचे अर्थ ग्लोबलच्या अहवालातून समोर आले आहे. तसेच जगातील १५ सर्वात प्रदूषित शहरांपैकी १२ शहरे ही भारतातील असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अर्थ ग्लोबल ही मुंबई आणि लंडन स्थित एक संशोधन संस्था भारतातील वायू प्रदूषणासंदर्भात विविध पातळीवर सर्वेक्षण करून त्याचा अहवाल सादर करते. दरवर्षी नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. या पार्श्वभूमीवर अर्थ ग्लोबलने नोव्हेंबर २०२४ मध्ये वायू प्रदूषणासंदर्भात इंटरॅक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स (आयव्हीआर) प्रणाली वापरून देशभर सर्वेक्षण केले होते. त्यात बिहार, दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांचा समावेश होता. सर्वेक्षण अहवालानुसार श्वसनाच्या संसर्गामुळे होणारे ३० टक्के मृत्यू हे वायू प्रदूषणामुळे होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच हृदय रोगाशी संबंधित २८ टक्के मृत्यूंसाठी वायू प्रदूषण कारणीभूत आहे. आरोग्याच्या तक्रारींमध्ये प्रामुख्याने श्वसन विकार, हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित तक्रारी जास्त असल्याचे या सर्वेक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यात प्रदूषणामुळे आरोग्य समस्या उद्भवणाऱ्यांमध्ये लहान मुले आणि वृद्धांचे प्रमाण अधिक आहे. तसेच सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ५५ टक्क्यांपेक्षा अधिक नागरिकांनी कुटुंबातील किमान एका सदस्याला प्रदूषणामुळे श्वसनाचा आजार झाल्याचे सांगितले. त्याचबरोबर श्वसनाच्या तक्रारीमुळे शाळेत तसेच कामावर ६५ टक्के नागरिक जाऊ शकले नाहीत. यामध्ये शाळा, कामाला तीन दिवसांपेक्षा अधिक सुट्टी घेतलेले ४०.९ टक्के विद्यार्थी आहेत. तीन दिवसांपेक्षा कमी सुट्टी घेतलेले २५.५ टक्के आहेत. त्यात १८ ते ३० वयोगटातील एकूण ७० टक्के जणांना किमान एक दिवस शाळा, कामाला मुकावे लागले आहे.

दरम्यान, वायू प्रदूषणात वाढ होत असताना आरोग्याच्या समस्येतही वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली आणि हरियाणासारख्या शहरांमध्ये ऑनलाईन शाळा घेणे, घरून काम करण्याची मुभा दिली जाऊ शकते. मात्र, छोट्या शहरांमध्ये मोल मजुरी करणाऱ्या नागरिकांसाठी घराबाहेर जाऊन काम करण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे या नागरिकांना वायू प्रदूषणाचा अधिक त्रास होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच ही कुटंबे हवा शुद्धीकरण यंत्र आदी संरक्षणात्मक उपायांचा वापर करण्याइतकी सक्षम नसतात.

## मुंबईत फिल्म सिटीजवळ भीषण आग; अग्निशमन दलाच्या १४ गाड्या घटनास्थळी, अनेक झोपड्या जळून खाक

मुंबई: मुंबईच्या पश्चिम उपनगरात असलेल्या गोरेगाव पूर्वेत भीषण आग लागलेली आहे. फिल्म सिटीच्या गेटजवळ असलेल्या संतोष नगर भागात आगडोंब उसळला आहे. संध्याकाळी साडे सातच्या सुमारास आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १४ गाड्या संतोष नगर परिसरात पोहोचल्या. सुदैवानं या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे प्रयत्न सुरु आहेत. आग लागण्यामागील नेमकं कारण अद्याप समजू शकलेलं नाही.



फिल्मसिटीजवळ असलेल्या संतोष नगर परिसरात झोपडपट्टीत आग लागल्याची घटना घडली. घरांमध्ये असलेल्या सिलिंडरचे एकापाठोपाठ स्फोट होऊ लागल्यानं आग झपाट्यानं वाढत गेली. अनेक झोपड्या आगीच्या भक्षस्थानी पडल्या. 'अग्निशमन दलाकडून आग विझवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सर्व संबंधित यंत्रणांना अलर्टवर ठेवण्यात आलेलं आहे. घटनास्थळी गरज लागल्यास एक रुग्णवाहिकादेखील सज्ज ठेवण्यात आलेली आहे,' अशी माहिती अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्यानं पीटीआयला दिली.

# गिलच्या शतकासह भारताचा बांगलादेशवर दणदणीत विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : शुबमन गिलचं शतक, केएल राहुलचा विजयी षटकार आणि मोहम्मद शमीचे ५ विकेट्स यासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पहिल्याच सामन्यात बांगलादेशवर ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या. तर भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना ६ विकेट्सने आणि २१ चेंडू शिल्लक ठेवत जबरदस्त विजयाची नोंद केली. शुबमन गिल, मोहम्मद शमी हे भारताच्या विजयाचे हिरो ठरले.




शुबमन गिल पहिल्यांदाच आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळत आहे आणि या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावत आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. सलामीसाठी उतरलेला गिल भारताला विजय मिळवून देतच माघारी परतला. गिलने १२९ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद १०१ धावा केल्या. उपकर्णधार असलेल्या शुबमन गिलने भारताच्या डावाची जबाबदारी घेत विजय मिळवून दिला.

तर मोहम्मद शमीने मोठ्या कालावधीनंतर भारतीय संघात पुनरागमन केले. पण आयसीसीने टूर्नामेंटमध्ये पाऊल ठेवताच शमीचा तोच वादळी फॉर्म पुन्हा पाहायला मिळाला. शमीने बांगलादेशच्या डावात ५ विकेट्स घेत आपल्या भेदक गोलंदाजीचा प्रत्यय दाखवून दिला. शमीने १० षटकांत ५३ धावा देत ५ विकेट्स घेतले.

बांगलादेशने दिलेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी रोहित शर्मा आणि शुबमन गिलची जोडी मैदानात उतरली. रोहित शर्मा झटपट खेळी करत ७ चौकारांसह ४१ धावा करत बाद झाला. तर विराट कोहली २२ धावा, श्रेयस अय्यर १५ धावा, अक्षर पटेल ८ धावा करत बाद झाले. विराट, श्रेयस आणि अक्षरचे लागोपाठ विकेट गेल्यानंतर भारतीय संघ आता पेचात अडकतो की काय, अशी स्थिती निर्माण झाली. पण नंतर आलेल्या केएल राहुलने गिलबरोबर संघाचा डाव सावरत विजयाकडे नेले.

केएल राहुलचा एक सोपा झेल सोडल्यानंतर राहुलने गियर बदलत गिलबरोबर वेगवान खेळी केली. राहुलने ४७ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह ४१ धावा केल्या. तर शुबमन गिल शतकी खेळी करत नाबाद माघारी परतला. बांगलादेशकडून रिशाद हुसैनने २ तर मुस्तफिजूर आणि तस्किन यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णयही बांगलादेशसाठी योग्य ठरला नाही. बांगलादेशच्या संघाने ५ विकेट्स गमावत फक्त ३ धावा केल्या होत्या. पहिल्या आणि दुसऱ्या षटकात सलग २ विकेट गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीचा निर्णय चुकीचा ठरल्याचे दिसून आले. ९व्या षटकापर्यंत, संघाने केवळ (पान २ वर...)

## महापालिकेच्या विविध विभागाची घेतली माहिती

## पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वछता, रस्ते, आरोग्य व शिक्षणास प्राधान्य द्या

# पहिल्याच दिवशी नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी घेतला आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी आज मिटींग हॉल येथे सर्व विभागातील अधिकारी यांची बैठक घेऊन महापालिकेचा कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी महापालिकेतील व स्मार्ट सिटीच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या विविध प्रकल्प तसेच उजनी ते सोलापूर दुहेरी पाईपलाईन चा सध्या स्थितीचा कामाचा आढावा, अमृत योजना, मला शुद्धीकरण प्रक्रिया, केंद्र शासन पुरस्कृत छ उझ च्या माध्यमातून झालेले कामाचा आढावा, रमाई आवास योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरि वस्ती सुधारणा योजना, शहरतील पाणी पुरवठा,लाईट विभाग, रस्ते, ड्रेनेज, घनकचरा विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, अमृत योजना,उद्यान विभाग,पर्यावरण विभागा संदर्भातील माहिती तसेच सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून कमांड अँड कन्ट्रोल सेंटर उभारणी करण्यात आली आहे.

शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी व सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करणेकामी इंटिग्रेटेड कमांड अँड



कंट्रोल सेंटरच्या नियंत्रण कक्ष, स्काडा प्रणाली, घंटागाडी रूट मॅप, शहरातील सीसीटीव्ही, सुरक्षा यंत्रणा, पाणीपुरवठा वितरणाचे कामकाजची सुरु आहे.शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत बसविणेत आलेल्या सीसीटीव्ही, एलईडी दिवे, कचरा संकलन केंद्राच्या गाड्या, पाणीपुरवठा वितरण प्रणाली व स्काड प्रणाली, ड्रेनेज बाबत तक्रारी,अग्निशमन विभाग,आपत्ती व्यवस्थापन आदी संदर्भात माहिती घेतली.या बैठकिस अतिरिक्त आयुक्त रवि पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,उपायुक्त आशिष लोकरे,उपायुक्त तैमुर मुलाणी,मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी, मुख्यलेखापाल रत्नराज जवळगेकर, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील,सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे, विद्युत कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, नगर सचिव प्रवीण दंतकाळे, संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर, आरोग्य अधिकारी राखी माने, अग्निशमन विभाग प्रमुख राकेश साळूंखे, किशोर सातपुते, उपअभियंता नीलकंठ मठपती, प्रकाश दिवाणजी, रामचंद्र पेंटर, तपण डंके, उद्यान अधिकारी किरण जगदाळे, कामगार कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे पशुवैधकीय अधिकारी सतीश चौगुले, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, विधना सल्लागार संध्या भाकरे सह सर्व विभागीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नूतन आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांनी सर्व अधिकारी यांना पाणी पुरवठा,स्वछता,रस्ते, आरोग्य व शिक्षण अश्या विषयास प्रधन्या दया व आप आपल्या विभागाची चांगल्या पद्धतीने कामकाज करण्याचा सूचना दिल्या.

## संपादकीय....

### भेदक गोलंदाजी

शुबमन गिलचं शतक, केएल राहुलचा विजयी षटकार आणि मोहम्मद शमीचे ५ विकेट्स यासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पहिल्याच सामन्यात बांगलादेशवर ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या. तर भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना ६ विकेट्सने आणि २१ चेंडू शिल्लक ठेवत जबरदस्त विजयाची नोंद केली. शुबमन गिल, मोहम्मद शमी हे भारताच्या विजयाचे हिरो ठरले. शुबमन गिल पहिल्यांदाच आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळत आहे आणि या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावत आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. सलामीसाठी उतरलेला गिल भारताला विजय मिळवून देतच माघारी परतला. गिलने १२९ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद १०१ धावा केल्या. उपकर्णधार असलेल्या शुबमन गिलने भारताच्या डावाची जबाबदारी घेत विजय मिळवून दिला. तर मोहम्मद शमीने मोठ्या कालावधीनंतर भारतीय संघात पुनरागमन केले. पण आयसीसीने टूर्नामेंटमध्ये पाऊल ठेवताच शमीचा तोच वादळी फॉर्म पुन्हा पाहायला मिळाला. शमीने बांगलादेशच्या डावात ५ विकेट्स घेत आपल्या भेदक गोलंदाजीचा प्रत्यय दाखवून दिला.

# राष्ट्रीय सेवा योजनेतून उद्याचे जबाबदार नागरिक बनतात : प्रा. डॉ. पवार

## स्वेरी अभियांत्रिकीच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराचा अजनसोंडमध्ये समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'एन.एस.एस. ही विद्यार्थ्यांसाठी एक अतिशय चांगली संधी असते. एन.एस.एस.च्या माध्यमातून तंत्रशिक्षण घेणारे विद्यार्थी देखील ग्रामीण भागाशी एकरूप होऊ शकतात, येथील नागरिकांचे प्रश्न समजून घेऊ शकतात व आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून काम करू शकतात. एकंदरीत उद्याच्या भारताचे जबाबदार नागरिक हे या एन.एस.एस. च्या माध्यमातून निर्माण होतात.' असे प्रतिपादन कासेगाव (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट स्टडीजचे प्राचार्य डॉ. एन. बी. पवार यांनी केले.






पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांच्या संयुक्त विद्यमाने अजनसोंड (ता. पंढरपूर) मध्ये दि ०९ फेब्रुवारी ते दि. १५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत या कालावधीत राष्ट्रीय सेवायोजने अंतर्गत 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. एन. बी. पवार हे मार्गदर्शन करत होते. यावेळी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार म्हणाल्या की, 'एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनेक नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. तंत्रज्ञानातून मिळालेले ज्ञान हे ग्रामीण भागाच्या विकासासाठी विद्यार्थी वापरू शकतात आणि त्यातून देशाची प्रगती होऊ शकते.' अजनसोंड मधील नागरिक तुकाराम डुबल म्हणाले की, 'स्वेरीच्या एन.एस.एस. मधील विद्यार्थ्यांनी आठवडाभर मनापासून परिश्रम घेवून शिक्षण, आरोग्य, ग्रामस्वच्छता, वृक्षलागवड पाणी व वीज बचतीचे महत्व अशा विविध उपक्रमांची जनजागृती करून अतिशय चांगले व इतरांना अनुकरणीय असे काम केले आहे. झाडे लावणे, स्वच्छता करणे, झाडांना अळी करून पाणी देणे, गावामध्ये रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करणे, पथनाट्य, शाळांमध्ये चित्रकला आणि निबंध स्पर्धा आधी गोष्टी अतिशय उत्तम पद्धतीने पार पाडल्या आहेत. स्वेरीच्या विद्यार्थ्यांमध्ये एक अनोखी शिस्त आहे ज्यामुळे त्यांनी केलेले काम हे नेहमीच उत्तम होते.' यावेळी अजनसोंड ग्रामस्थांच्या वतीने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि एन.एस.एस.चे विद्यार्थी प्रतिनिधी व सर्व स्वयंसेवकांचा सन्मान करण्यात आला. तसेच निबंध व चित्रकला स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शांताप्रभू प्रशाला अजनसोंड या शाळेतील विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अजनसोंड मधील सरपंच रामचंद्र घाडगे, उपसरपंच बाळासो कांबळे, ग्रामसेवक सौ. सविता हंजगीकर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, शांताप्रभू प्रशालेतील शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश खडतरे, सर्व प्रतिष्ठित नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी लोंढे यांनी केले तर यश शेळके यांनी आभार मानले.

## गिलच्या शतकासह भारताचा बांगलादेशवर दणदणीत विजय

(पान १ वरून..) ३५ धावांमध्ये ५ विकेट गमावल्या होत्या, त्यापैकी शमीने २ विकेट घेतल्या होत्या. ९व्या षटकात अक्षर पटेलने लागोपाठ २ विकेट घेतल्या मात्र रोहित शर्माने जकीर अलीचा झेल सोडल्याने अक्षर हॅटट्रिक घेऊ शकला नाही. रोहितच्या कॅच ड्रॉपचा फटका टीम इंडियाला बसला. जकीर अलीने तौहीद हृदयसह सहाव्या विकेटसाठी १५४ धावांची शानदार भागीदारी करत संघाचा डाव सावरला. यादरम्यान हार्दिक पंड्यानेही झेल सोडत तौहीदला दिलासा दिला. त्यावेळी तो केवळ २३ धावांवर खेळत होता. पण दोन्ही फलंदाजांनी याचा फायदा घेतला आणि या शानदार भागीदारीसह त्यांनी संघाला स्पर्धात्मक स्थितीत आणले. जकीरला बाद करून शमीने एकदिवसीय क्रिकेटमधील २०० विकेट पूर्ण केले. तर तौहीदने एकदिवसीय क्रिकेटमधील पहिले शतक पूर्ण करून तो दिवस संस्मरणीय बनवला. मात्र, शमीने शेवटच्या फलंदाजांना जास्त काळ टिकू दिले नाही आणि ५ विकेट घेत बांगलादेशचा डाव २२८ धावांवर आटोपला. भारताकडून शमीने ५, हर्षित राणाने ३, अक्षर पटेलने २ विकेट घेतले. भारताचा आता पुढील सामना रविवारी २३ फेब्रुवारीला पकिस्तानविरूद्ध होईल.




## सुपतगाव येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील हनुमान चौकात शिवरायांच्या सिंहासनाधीश्वर प्रतिमेस पूजन करून पुष्पहार अर्पण करून विविध उपक्रमाने शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

यावेळी उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि प सदस्य दिलीप भालेराव, चंद्रकांत हेंडले, रमेश लामजने, काशिनाथ करके, सरपंच पती रतन लामजणे, महादेव कुंभार, अप्पाराव मुळे, संभाजी माने, वैजनाथ काळे, गणपती कबाडे, सातलिंग लामजने, नागनाथ हेंडले, दत्तात्रय गिरी यांची उपस्थिती होती.


श्री शिवछत्रपती युवा प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच या शिवजयंती सोहळ्यानिमित्त भाषणे, गुणवंत विद्यार्थी सत्कार, शिवशाहीर पोवाडे कार्यक्रम, रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

तसेच संभाजी माने यांच्यावतीने सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच संध्याकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली, सर्व शिवभक्त मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन शिवजयंती उत्साहात साजरी केली.

हा सर्व कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी छत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुलचंद मातोळे, गोपाळ पाटील, सचिव महादेव भोईटे, खजिनदार कालिदास भुजबळ, पुरुषोत्तम मुळे, भालचंद्र मातोळे, सिद्धेश्वर माने, इंद्रजीत मुळे, मल्लिनाथ मातोळे, विष्णु शिंदे,राम मुळे, गणेश मुळे,बळी भोईटे, सतीश मुळे, ज्ञानेश्वर भुजबळ, नवनाथ शिंदे, गहीनाथ शिंदे यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी गावातील सर्व विद्यार्थी, शिवभक्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन गुरव, तर आभार भालचंद्र मातोळे यांनी मानले.

## बार्टीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर,मातीच्या कानावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक मा.श्री. सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

शिवजयंती निमित्त शुभेच्छा देताना मा. महासंचालक श्री. वारे म्हणाले की लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केले.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाद्वारे सर्वांना न्याय दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हातात तलवार होती तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हातात लेखणी होती.आपण महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजेत असे मत त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केले. इतिहास संशोधक डॉ. संभाजी बिराजे यांनी शिवजयंतीनिमित्त मनोगत व्यक्त केले. शिवाजीनगर, पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास विभागप्रमुख श्री. उमेश सोनवणे, प्रकल्प व्यवस्थापक श्री. सुमेध थोरात यांच्या हस्ते विनम्र अभिवादन करण्यात आले. निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, रविन्द्र कदम, दादासाहेब गिते, उमेश सोनवणे, सचिन जगदाळे यांच्यासह बार्टी संस्थेतील जनसंपर्क अधिकारी स्तुती दैठणकर व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री. रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्री सुमेध थोरात यांनी मानले.

## विमा योजना बंद करून थेट शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनिधी : केंद्र, राज्य सरकार तसेच शेतकरी हिस्सा ही रक्कम कोट्यवधी रुपयांत आहे. त्या तुलनेत शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई अत्यल्प असून विमा कंपनी व शेतकऱ्यांमध्ये भरपाईच्या मुद्द्यावरून वादही उद्भवतात त्या पार्श्वभूमीवर विमा योजना बंद करीत थेट शेतकऱ्यांनाच दरवर्षी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली.

केंद्र आणि राज्य सरकारकडून सुरुवातीला विमा कंपन्यांना ५०-५० टक्के हिस्सा विमा हप्ता म्हणून दिला जात होता. त्याबरोबरच शेतकऱ्यांकडून देखील विमा हप्ता भरून घेण्यात येत होता. त्यानंतरच्या काळात या तरतुदीत बदल करून केंद्राने आपल्या हिश्शात वाढ केली. या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी विमा कंपन्यांना मिळत असताना पीक नुकसानी नंतर भरपाई



**राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी यांची मागणी**

संदर्भातील मुद्दे निश्चितच चिंतनीय आहेत. विमा भरपाई आणि इतरही सारे निकष आणि अटी सध्या कंपन्या पूरक आहेत. कंपन्यांनी नियम ठरविताना स्वतःचे जास्त हित जपण्यावर भर दिला आहे. त्यामुळे कंपन्यांऐवजी सरकार पातळीवर निकष निश्चित करून या अटी मान्य असलेल्या कंपन्यांनाच पीकविमा क्षेत्रात उतरविण्याची गरज आहे किंवा विमा हप्त्याऐवजी सरसकट शेतकऱ्यांना मदतीचा प्रस्तावही योग्य आहे. शेतकऱ्यांचा छळ कंपन्यांद्वारे होतो. अक्षरशः त्यांना वेठीस धरले जाते. जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देखील कंपन्या जुमानत नाहीत. त्यामुळे शासनाने पुढाकार घेत केंद्र आणि राज्य सरकारचा विमा हप्ता तसेच शेतकरी विमा हप्ता गृहीत धरत थेट शेतकऱ्यांच्याच खात्यात दरवर्षी ठरावीक रक्कम जमा केली तर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे

## पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी प्र.विजया पांगरकर यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव, तहसीलदार सचिन लंगुंटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी अँड.सुनील वाळूजकर, प्रशासकीय अधिकारी रविंद्र सूर्यवंशी,नगर अभियंता नेताजी पवार,उप अभियंता प्रकाश केसकर,पाणी पुरवठा अभियंता राज काळे,आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर खरेदी पर्यवेक्षक विजय शहाणे, कृष्णात जगताप,सुवर्णा हाके, करुणा शेळके,संभाजी देवकर,जयंत पवार, दर्शन वेळापूरे,चेतन चव्हाण हे उपस्थित होते.

## जनता विद्यालय कोमलवाडी येथे शिवजयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय कोमलवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरद घुले होते. व्यासपीठावर स्कूल कमिटी सदस्य लहानु घुले, सोमनाथ जाधव, साहेबराव बोंबले विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक हे होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची आरती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी भगवे फेटे परिधान करून पारंपारिक वेशभूषा केली होती. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या



जीवनावर आधारित सुंदर असे नाटक सादर करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्थानावरून शरद घुले यांनी प्रस्ताविकातून असे नमूद केले की, भारतीय इतिहासातील शूर, पराक्रमी, सहिष्णू, आदर्श शासनकर्ता राजा म्हणून ओळखले जातात . त्यांनी पश्चिम भारतात मराठा साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली म्हणून त्यांना आदराने शिवराय, राजे, शिवाजी महाराज असे म्हटले जाते. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक आपल्या भाषणातून असे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज अजूनही एक शूर योद्धा, नवीन लष्करी रणनीती वापरणारे चतुर रणनीती कार आणि एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय कमी वयात आपली जबाबदारी म्हणून स्वराज्यासाठी कार्य केले. असे आपल्या भाषणातून व्यक्त केले.

यावेळीस विद्यालयाचे क्रीडाशिक्षक सचिन गिते व शितल रायते यांनी छत्रपती शिवाजी महाराज विषयी भाषण केले. बाजीराव ढोमसे,स्वाती जोंधळे, चित्रा बाजारे, ऋतुजा वाघ, सुदर्शन गांडुळे, सागर बस्ते, शरद टेमगर शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा गोराडे- वारुंगसे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार केशव वळवी यांनी मानले.

## ग्रामपंचायत गोगांव व अंगणवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : ग्रामपंचायत गोगांव व अंगणवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, माजी तंटा मुक्त समिती अध्यक्ष कल्याणराव बिराजदार, सूर्यकांत जिरगे, कृषी अधिकारी शिरगापुरे, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### प्रवासादरम्यान तरुणाची बॅग पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : पुणे ते तुळजापूर शिवशाही बस मधून प्रवास करत असताना प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने फिर्यादी विनोद लक्ष्मीपुत्र मणी (वय-२९,रा.मु.पोस्ट दुधनी, तालुका अक्कलकोट) यांची बॅग चोरून नेल्याची घटना १७ फेब्रुवारी रोजी इंदापूर ते जुना तुळजापूर नाका यादरम्यान घडली. याप्रकरणी विनोद यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्या बॅगमध्ये ७५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप व कपडे होते. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

# शिवाजी महाराजांचा आदर्श युवकांनी घ्यावा : हर्षवर्धन पाटील

## बावडा येथे शिवजयंती निमित्त शोभायात्रा; हर्षवर्धन पाटलांचा शोभायात्रेत सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राजमाता जिजाऊं पासून प्रेरणा व संस्कार घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेसाठी स्वराज्याची स्थापना केली. जीवनात संकटे आली तरी त्यावर संयमाने कशी मात करावी, हे शिवचरित्रातून शिकावे. युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन जी-वनामध्ये यशस्वीपणे वाटचाल करावी, असे आवाहन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

बावडा येथे शिवाजी एज्युकेशन संस्थेच्या प्रांगणामध्ये छत्रपती शिवाजी म हाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास ३९५ व्या शिवजयंतीनिमित्त हर्षवर्धन पाटील यांनी बुधवारी (दि.१९) पुष्पहार अर्पण करून पूजा व आरती केली. सदर प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते.

ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी म हाराजांचे विचार घेऊन आपणा सर्वांना कायम वाटचाल करावयाची आहे. छत्रपतींचा आदर्श हा समाजातील प्रत्येकासाठी यशस्वी जीवन जगण्यासाठी उत्तम आहे. शिवाजी म हाराजांच्या मातीत आपण जन्मलो आहोत. शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र समाजाला कायमच प्रेरणा व स्फूर्ती देत राहील, असे गौरवोद्गार हर्षवर्धन पाटील यांनी काढले. यावेळी भाषणात हर्षवर्धन पाटील यांनी शिवजयंती कार्यक्रम

### बावडा गावची शिवजयंती आदर्श : हर्षवर्धन पाटील

**छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ असा भव्य दिव्य पुतळा झाला आहे. आता प्रत्येक वर्षी आजच्याप्रम ाणे अश्वारूढ पुतळ्यापासून प्रत्येक वर्षी भव्य शोभायात्रा निघेल. पुढील वर्षी या शोभायात्रेत महिलांचाही सहभाग राहील. बावडा गावची शिवजयंती तालुक्यामध्ये नव्हे तर राज्यभर आदर्श अशीच असेल, असे प्रतिपादन यावेळी बोलताना हर्षवर्धन पाटील यांनी केले.**



व शोभायात्रेचे भव्य नियोजन केलेबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष मनोज पाटील, उदयसिंह पाटील, सचिव किरण पाटील व संचालन मंडळाचे कौतुक केले.

या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांनी लेझीम पथक, झांज पथक तसेच लाठी-काठी या मर्दानी खेळाची आकर्षक प्रात्यक्षिके सादर केली. याप्रसंगी श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी, शिवप्रतिष्ठान बावडा व छत्रपती शिवाजी तरुण मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी सैनिक, ग्रामस्थ उप-स्थित होते. या कार्यक्रमानंतर सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली भव्य शोभायात्रा गावातून काढण्यात आली. या शोभायात्रेमध्ये हर्षवर्धन पाटील हे सहभागी झाले.

या शोभायात्रेमध्ये छत्रपती श्री शिव-ाजी महाराजांचा पु-तळा रथ, छत्रपती शिवाजी महाराज व अष्टप्रधानमंडळाच्या वेशातील विद्यार्थी, मावळ्यांच्या वेशातील घोडस्वार विद्यार्थी, सेनापती तानाजी मालुसरे व वीर बाजीप्रभु यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी, छत्रपती शिव-ाजी महाराज पालखी यांचा सहभाग होता. तसेच लेझीम पथक, झांज पथक, तुतारी, लाठी-काठी पथक व मावळ्यांच्या वेशातील



विद्यार्थी यामुळे बावडा गावातील वातावरण शिवमय झाले होते. शोभयात्रा बावडा बाज-ारतळ येथे आलेनंतर शिवप्रतिष्ठान बावडा व शिवाजी तरुण मंडळ यांच्या वतीने आयोजित शिव प्रतिमा पूजन कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांनी झांज पथक, लेझीम व मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी हर्षवर्धन पाटील, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घ्यावा : सुयश दुसान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : छत्रपती शिवाजी महाराजांनी अविरत परिश्रम घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. प्रशासन यंत्रणा देखील कार्यान्वित केली. त्यामुळे स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर झाले. त्यामुळे त्यांचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथील प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी व्यक्त केले.

### छत्रपती शिवाजी महाराज हेच आमचे आदर्श

**छत्रपती शिवाजी महाराजांनी बालपणापासूनच परिश्रम घेऊन स्वराज्याची उभारणी केली. त्यामुळे कठोर व अविरत परिश्रमाशिवाय पर्याय नाही हे तत्व महाराजांच्या व्यक्तिमत्त्वा-तून आम्ही स्वीकारले आहे. म्हणूनच सर्वांगीण विकासासाठी आम्ही झटतो आहोत ही सर्व महाराजांची प्रेरणा आहे असे प्रतिपादन संस्थेचे जेष्ठ सदस्य मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.**

महर्षी विवेकानंद सम ाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती निमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य म लकप्पा भरमशेट्टी होते. यावेळी प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात शिव जयंतीनिमित्त कार्यक्रम

पुढे बोलताना ते म्हणा-ले की, छत्रपती शिवाजी महाराजांकडे बालपणापा-सूनच शौर्य, धाडस आणि पराक्रम करण्याची तयारी होती. त्यामुळे अनेकवेळा त्यांनी कठीण प्रसंगाचा धैर्याने सामना केला. अविरत लोककल्याणकारी कार्य केले. कृषी, सैन्य, प्रशासन आदि मूलभूत सुविधा जनतेसाठी उप-लब्ध करून दिल्यामुळे त्यांच्या चरित्रातून आपण अविरत कष्ट करण्याचा बोध घेतला पाहिजे.

प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी म्हणाले की, छत्रपती शिव-ाजी महाराज यांच्या चरित्रातून युवकांनी प्रेरणा घेतली पाहिजे. कठीण प्रसंगास सामोरे जाण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्राध्यापिका शितल झिंगाडे- भस्मे यांनी केले तर आभार प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा भीम सोनकांबळे उपस्थित होते.

# संस्कारक्षम घडवण्याची श्रमसंस्कार शिबिराची गरज : सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी

महोदय विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्तीचे प्रेरणा मिळावी, यासाठी महाविद्यालयीन श्रम संस्कार शिबिरे घेणे महत्त्वा-चे आहे. अशा शिबिरातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार तर होतातच शिवाय त्यांच्यामध्ये सामाजिक भावना देखील निर्माण होते श्रमसंकारची डिजिटल युवा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आणि सामाजिक संस्कार आहे.

संकर्षण पिढी घडवण्यासाठी अशा शिबिराची गरज आहे, असे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले, आंबे तालुका पंढरपूर येथील श्याम शंकर शिबिराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते




चळे तालुका पंढरपूर येथील श्रीकृष्ण महाविद्यालय ते विद्यार्थ्यांचे आंबे येथे श्रम संस्कार शिबिर पार पडले म हाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहा दिवस शिबिरात निवासी सहभाग घेतला होता शिबिराच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवून गावात स्वच्छता मोहीम राबवली व या निमित्ताने

### आंबे तालुका पंढरपूर येथे श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

विविध सामाजिक व शैक्षणिक विजय विचार मंथन ही झाली. आमदार सावंत पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांचे कल्पनाशक्ती व प्रचंड आहे परंतु त्यांच्या या शेट्टीला योग्य दिशा देण्याची गरज आहे श्रमसंकार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम केले जाते शिबिरातून केवळ सामाजिक प्रबोधन केले जात नाही तर त्यांच्यावर सामाजिक संस्कार ही देखील केली जातात.

आंबे तालुका पंढरपूर येथील शमशमकार शिबिराच्या समारोप कार्यक्रमात बोलताना कार्यक्रम ाचे अध्यक्ष माजी आमदार दत्तात्रय सावंत, श्रीमती प्राजक्ता सावंत, संपत ग्रामपंचायत आंबे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय मुजमुले, विभागीय समन्वय क रासोयोग प्राचार्य बाबर एन श्रीकृष्ण महाविद्यालय चळे डॉक्टर शशिकांत तांबे प्राचार्य बळीराम दादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय चळे

अण्णा मामा शिंदे एनएसएस कार्यक्रमाधिकारी सौ एडके पीएम श्रीकृष्ण महाविद्यालय चळे एनएसएस विभाग प्रमुख डॉक्टर होणकळस यांनी बळीराम दादा बनसोडे शिक्षण शास्त्र म हाविद्यालय चळी प्रसिद्ध दांडगे जीपी सर आणि इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

# तांबरवाडी राजेवाडी जिल्हा परीषद केंद्रिय प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : आज औसा तालुक्यातील तांबरवाडी राजेवाडी येथील जिल्हा परीषद केंद्रिय प्राथमिक शाळा येथे आठवी वर्गाचा स्वयंशासन दिन व समारोप सोहळा साजरा करण्यात आला .यावेळी आठवि वर्गातील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षीका मनुन काम पाहिल व पहीली ते सातवी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच काम केल ,एक दिवसीय स्वयंशासन दिनानिमीत्त आठवी वर्गातील विद्यार्थ्यानी अगदी खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांना विद्या दान देत प्रत्येक वर्गावर जाउन शिकवणी दीली यावेळी मुख्याध्यापक मनुन अदिती जीवन जाधव या विद्यार्थीनीने मुख्याध्यापक पदी काम करताना प्रत्येक शिक्षक व शिक्षीका आपल्या तासीका कशा घेतात व कस शिकवतात हे प्रत्येक वर्गावर जाउन मुख्याध्यापक अदिती जाधव हिने काम पाहत आपली जिम्मेद-ारी घेउन काम पाहीले ,जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन साजरा करण्यासाठी राजेवाडी शाळेच्या मुख्याध्यापीका आशा मेह्त्रे व शाळे-तील शिक्षीका पारसेवार .सुर्यवंशी ,गरड, यांनी विशेष लक्ष देउन विद्यार्थ्यांना स्वयंशासन दिना साठी तयारी केल्याच विद्यार्थीनींनी यावेळी सांगीतले यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक सोमनाथ देशम ाने,बिरादार सर ,राजेवाडी मुख्याध्यापिका आशा मेह्त्रे.महानंदा सुर्यवंशी .सविता पारसेवार,राधा बिराजदार ,सह शाळेतील शिक्षक विद्यार्थी उपस्थीत होते ,

### मुख्याध्यापक अदिती जीवन जाधव तर उप मुख्याध्यापक अक्षरा कोव्हाळे यांनी केले उत्कृष्ठ कार्य



शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विभागाने घेतली आंदोलनाची दखल

शिक्षणाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक चंद्रकांत होळकर यांनी घेतलीआंदोलनकर्त्यांची भेट

# अहवाल प्राप्त होताच १५ दिवसांत कारवाई; शिक्षण विभागाने दिले पत्र; मागासवर्गीय संघटनेचे आंदोलन मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अक्कलकोट तालुक्यातील शिक्षण विभागातील बेकायदेशीरपणे देण्यात आलेल्या प्रतिनियुक्तीची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य मागासव-र्गीय शिक्षक संघटनेने मंगळवारपासून जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले. या आंदोलनाची दखल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विभागाने घेतली असून चौकशी अहवाल प्राप्त होताच १५ दिवसांत कार्यवाही करू असे लेखी पत्र आंदोलनकर्त्यांना दिल्याने म ागासवर्गीय संघटनेने आंदोलन मागे घेतले.

अक्कलकोट तालुक्यामध्ये मनमानी पद्धतीने, अधिकाराचा गैरवापर करून शिक्षण विभागात प्रतिनियुक्त्या झाल्याने सीईओंकडे तक्रार केली. या तक्रारीनंतर समिती नेमली, चौकशी झाली. या चौकशीचा अहवाल सीईओ यांच्याकडे सादर केला. अहवाल सादर करूनही संबंधितावर कारवाई होत नसल्याने मागासवर्गीय शिक्षक संघटनेने मंगळव-ारपासून जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले. आंदोलनाची गंभीर दखल घेत शिक्षणाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक चंद्रकांत होळकर यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन चौकशी अहवाल अद्याप प्राथमिक शिक्षण विभागाकडून प्राप्त झाला नाही. अहवाल प्राप्त होताच नियमानुसार १५ दिवसांत कार्यवाही करण्यात येईल. संघटनेने आंदोलन मागे घ्यावे, असे लेखी पत्र दिले.

**शिक्षणाधिकारी कार्यालयाने कारवाईबाबत आश्वासन दिले. आश्वास-नाची पूर्तता न झाल्यास जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासम ोर आत्मदहन करणार आहे. चौकशी करून संबंधितांवर कारवाई व्हावी हीच आमची मागणी आहे.**

**– महांतेश कट्टीमनी, आंदोलनकर्ते**

**अहवाल नाही आला..**

शिक्षणाधिकारी (योजना) यांच्या समितीने अक्कलकोट तालुक्यातील प्रतिनियुक्तीसंदर्भात चौकशी केली. मात्र या चौकशीचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) या विभागाकडे प्राप्त झाला नसल्याचे आंदोलनकर्त्यास सांगण्यात आले.







# प्रल्हाद साळुंखे यांना शिव प्रेरणा आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : नवे दानवाड तालुका शिरोळ येथील पत्रकार प्रल्हाद साळुंखे यांना दसरा चौक शाहु स्मारक भवन कोल्हापूर येथे छत्रपती शिव-ाजी महाराज सर्व धर्मीय जयंती महोत्सव समिती यांच्या वतीने, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्ताने शिवार न्युज चे पत्रकार प्रल्हाद साळुंखे यांना शिव प्रेरणा आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्याना सन्मान चिन्ह शाल श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन मा, हातकणंगले तालुक्याचे आमदार अशोकराव माने, सतोंष आठवले संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष, स्वराज्य क्रांती सेना पँथर आर्मी, मा सचिन रमेश माने, अध्यक्ष छत्रपती शिवाजी महाराज सर्व धम ीय महोत्सव समिती, मा आमोल कुरणे संस्थापक अध्यक्ष परिवर्तन फौडीशन व मचिंद्र रूईकर, स्वराज्य क्रांती सेना पँथर आर्मी कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष यांच्या शुभहस्ते देऊन गौरवण्यात आले. त्यावेळी जिल्ह्यातील मान्यवर म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...



### निफाड येथील प्रभाग १२ मधील सभामंडप लोकार्पण सोहळा

निफाड (प्रतिनिधी) : निफाड येथील प्रभाग क्रमांक १२ मध्ये ग्रामदैवत सप्तशृंगी माता मंदिर असून या मंदिरात वर्षभर विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम होत असतात या मंदिराला सभा मंडप नसल्याने. लोक आग्रहास्तव व माजी नगरसेवक देवदत्त कापसे यांचे विशेष प्रयत्नातून महाराष्ट्र नगरोत्थान या योजनेतून ३८ लक्ष रुपयांचा भव्य सभामंडप बांधण्यात आला आहे,याचा लोकार्पण सोहळा माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार ,नगराध्यक्ष डॉ. कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, माजी नगराध्यक्षा रत्नमाला कापसे, यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला, याप्रसंगी नगरसेवक किशोर ढेपले, संदीप जेऊघाले ,सचिन गीते, मधुकर शेलार ,नंदकुमार कापसे, आसिफ पठाण, मोहन जाधव, तसेच आशा पंडित, मंदाकिनी मोगल, सुजाता तनपुरे, मंदाकिनी खालकर, लक्ष्मीबाई पाचारणे, कमल कर्वे, शांताबाई खापरे, जयश्री कासुर्डे, रीना ठाकरे, योगिता लोंढे, शितल मोगल ,कल्याणी जाधव, तसेच प्रभागातील नागरिक . महीला मोठ्या संख्येने उपस्थित होते

### दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक केए.३२. एच.बी.७११० हि अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १५ फेब्रुवारी रोजी माजी सैनिक नगर विजापूर रोड येथे घडली.याप्रकरणी नारायण शंकर भालेराव (वय-२१,रा.माजी सैनिक नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# धनदांडग्यांनी गरिबांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याच्या शासनाच्या आदेशाला दाखवली केराची टोपली

## तेजपृथ्वी ग्रुप करणार दूध का दूध पाणी का पाणी : अनिताताई खरात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर तालुक्यात शिक्षणाचा मूलभूत अधिकार ठ ढ ए अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात अनियमितता,भ्रष्टाचार दिसून येत आहे. त्यासाठी गट शिक्षण अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून त्याची सखोल चौकशी करावी.

इंदापूर तालुक्यातील ठ ढ ए साठी अनेक डमिशन ही धनदांडग्यांची, श्रीमंताच्या मुलांची झालेली आहेत. गरिबांना मोफत शिक्षण देण्याच्या शासनाच्या उद्देशाला केराची टोपली दाखवली गेली आहे. आपल्या तालुक्यातील अनेक श्रीमंत पालकांनी आपल्या मुलाची ऍडमिशन ठढए मधून मोफत व्हावी यासाठी इंदापूरच्या जवळपास राहणाऱ्या नातेवाईक, मित्र किंवा काही पैसे देऊन तात्पुरत्या स्वरूपाचे भाडेकरार करून त्यावरती प्रवेश घेतले आहेत. परंतु ते त्या ठिकाणी अजिबात राहत नाहीत. ते इंदापूर पासून वीस पंचवीस किलोमीटर अंतरावरती आपल्या गावीच राहतात .तसेच काही महाभागाने तर भाडेकरार वेगळ्या ठिकाणचे व लोकेशन वेगळ्याच ठिकाणची दिली आ-हेत. ज्यांचे नंबर लागले आहेत व त्यांनी पूर्वी भाडेकरार केलेले नाहीत ते लोक आता भाडेकरार करत आहेत. नियमानुसार भाडेकरार प्रवेश घेण्याच्या अगोदरचा असला पाहिजे.ज्यांना खरी गरज आहे ते मात्र यापासून वंचीत राहिले आहेत, काहीनी आपल्या वशिल्याच्या जोरावर,काहीनी अधिकाऱ्यांना चिरी मिरी देऊन, काहींनी बनावट कागदपत्रे बनवून गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांना यापासून वंचीत ठेवले आहे. या व इतर गोष्टीची चौकशी करून यावरती गटशिक्षण अधिकाऱ्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमावी व याचा खरा लाभ गरजवंत विद्यार्थ्यांना मिळवून द्यावा असे निवेदन आज तेजपृथ्वी ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी इंदापूरचे गटशिक्षणाधिकारी यांना दिले. यावेळी अनिता खरात म्हणाल्या की धनदांडग्यांच्या अशा खोटारड्या वृत्तीमुळे गोरगरिबांची मुले या योजनेपासून वंचित राहत आहेत धनदांडगे आपल्या ओळखीचा फायदा घेऊन किंवा इंदापूरच्या जवळपासच्या घरमालकांना अमिष दाखवून त्यांच्याकडून भाडेकरार करून घेऊन आपली मुलं या योजनेत बसवतात आणि गरीब मात्र यापासून वंचित राहतात . पालकांचा उद्रेक होण्याअगोदर शिक्षण खात्याने स्पॉट व्हिजिट करून या गोष्टीचा छडा लावावा व ज्यांनी कोणी अशी चुकीचे केले आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी.

यावेळी सद्दाम बागवान,विशाल म्हेत्रे संदीप रेडके व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# अक्कलकोट येथे बीडप्रमाणे आकाटोळी जागोजागी निर्माण होत आहेत काय?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /कमलाकर सोनकांबळे :

सुरत चेन्नई मार्गासाठी जी.आर. एल.इन्फ्रास्ट्रक्चरच्या लोकांनी पूर्वपरवानगी न घेता दंडेलशाही ने शेतकरी महादेव मडोळप्पा साखरे ( बागेहळ्ळी) यांच्या शेतामध्ये पंधरा फूट खोल खड्डा खोदून गौण खनिज मुरूम मोठ्या प्रमाणात उकरून नेले आहे उलट संबंधित शेतकऱ्याला धमकी दिली जात आहे हे पाहता बीडप्रमाणे आकाटोळी जागोजागी निर्माण होत आहेत काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. महादेव साखरे यांनी तहसीलदार यांच्याकडे रीतसर तक्रार नोंदविली आहे.

याबाबतची हकीकत अशी की महादेव मडोळप्पा साखरे (बागेहळ्ळी) यांची काही जमीन ही दोन नंबर तलावामध्ये गेलेली आहे आता फक्त ३६ गुंठे जमीनच शिल्लक राहिली आहे. त्यावरच त्याला पी. एम. किसान योजनेचा लाभ मिळतो त्याची उपजीविका त्याच्यावरच अवलंबून आहे.असे असताना मध्यरात्रीच्या सुमारास गट नंबर १५७ मध्ये दंडेलशाही ने घुसून १५ फूट खोल खड्डा जेसीबी आणि इतर अवजाराद्वारे खोदून गौण खनिज मुरूम वगैरे जबरदस्तीने घेण्यात आला आहे.या संदर्भात तालुका शिवसेनाप्रमुख संजय देशमुख (शिंदे गट) यांनी देखील संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला असता त्या गरिबाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेऊ असे सांगितले.

प्रत्यक्षामध्ये संबंधित अल्पभूधारक शेतकऱ्यालाच दमदाटी केली जात आहे.या प्रकाराने अल्पभूधारक शेतकऱ्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मनमानी पद्धतीने मुरूम मोठ्या प्रमाणात उकरला जात आहे.बीडच्या धरतीवर सुरज चेन्नई महामार्गासाठी गरिबांच्या शेतातील मुरूम लुटण्यासाठी आकाटोळी निर्माण होत आहेत काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

रात्री अप रात्री असे प्रकार घडत आहेत. संबंधित अल्पभूधारक शेतकरी महादेव साखरे यांनी ते शेत पूर्ववत करून नुकसान भरून देण्याची मागणी केली आहे.

मध्यंतरीच्या काळात स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्यात जवळील एका शेतकऱ्याच्या शेतातील गौण खनिज असे जबरदस्तीने घेऊन जाण्यात आले होते त्या शेतकऱ्याने कायदेशीर कारवाईचा बडगा उभारताच संबंधिताचे शेत पूर्वत करून देण्यात आले.

# हन्नूरच्या अनंत चैतन्य प्रशालेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था ,अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशालेच्या दहावीतील विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. प्रारंभी आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते विद्यादेवी सरस्वती व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पुजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.




यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संचालक श्री. शिवप्पा भरमशेट्टी,श्री.मल्लिकार्जून मसुती उपस्थित होते.यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी कु. सईराणी पवार, स्मिता काळे, अबोली निकम, करिश्मा जमादार व चतुर्दश सुरवसे, ओंकार गावडे या मुलां- मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले. व भविष्यात या शाळेकडून मिळालेल्या संस्काराच्या बळावर चांगले उच्च शिक्षण घेऊन या शाळेचे नांव उज्वल करू असे आश्वासित केले.यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी विद्यार्थ्यांना वर्षभर सर्व विषय शिक्षकांकडून आपल्याला मिळालेल्या ज्ञानाच्या शिदोरीच्या जोरावर आपण सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोबल खचू न देता अत्यंत धैर्याने व मोठ्या आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा असे आवाहन करून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे संचालक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळे दाखले, उदाहरण व गोष्टी रुपातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व संस्थेची स्थापना,प्राप्त परिस्थिती, संस्थेने अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून मार्गक्रमण करत केलेल्या प्रगती विषयी विद्यार्थ्यांना अवगत करत सध्याच्या स्पर्धात्मक जीवनामध्ये आपल्याला परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय यश मिळणे कठीण आहे म्हणून आपण सर्व विद्यार्थ्यांनी खुप मेहनत करून यशस्वी व्हा अशा शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. समीक्षा बाबर,प्रास्ताविक कु. भाग्यश्री स्वामींनी केले तर आभार कु. करूणा हेगडे हिने मानले. यावेळी या कार्यक्रमास पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व दहावीतील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या उत्तम नियोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री.सचिनदादा कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड श्री.सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते श्री.सागरदादा कल्याणशेट्टी,सी. ई.ओ.सौ.रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुक केले.

# श्री शंभू महादेव विद्यामंदिरात दहावी विध्यार्थी निरोप व वार्षिक पारितोषिक वितरण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घोळसगाव/प्रतिनीधी : अपूर्वा अभिमीत ज्ञानपीठ अंतर्गत श्री शंभू महादेव विद्यामंदिर(मराठी/कन्नड), घोळसगाव येथे आदर्श विध्यार्थी गौरव,दहावी विध्यार्थी निरोप व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेच्या सर्वेसर्वा सौ. मनीषाताई अशोक भांजे मॅडम तर प्रमुख अतिथि श्री नदाफ सर,श्री साळुंखे सर व सरपंच श्री राजशेखर किवडे होते.प्रथम मान्यवरांच्या हस्ते विद्यादेवता सावित्रीबाई फुले यांच्या फोटोचे पूजन करून अध्यक्षांचा सत्कार मुख्याध्यापिका सौ. पाटील मॅडम तर प्रमुख अतिथिंचा सत्कार मुख्याध्यापक श्री हडपद सर यांनी केला. दहावी मराठी माध्यम विध्यार्थी यांनी प्रशालेस स्टील कपाट तर दहावी कन्नड विध्यार्थी यांनी तीन लोखंडी टेबल प्रशालेस सप्रेम भेट सौ. भांजे मॅडम यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले.आदर्श गुणवंत विध्यार्थी सन २०२४-२५ पुरस्कार कु. मनीषा चनबसप्पा आलुरे (१० वी मराठी)व कु. प्रवीण विश्वनाथ पाटील (१० वी कन्नड)यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून माता-पित्यासह गुणगौरव व सत्कार करून शालेय साहित्य भेट देण्यात आले. आठवी, नववी विदयार्थ्यांनी निरोप भाषणे तर दहावी विदयार्थ्यांनी ओल्या डोळयानी भवाना मांडल्या. अध्यक्षा सौ भांजे मॅडम यांनी बोर्ड परीक्षेकरिता शुभेच्छा देऊन प्रशालेचे, मतापित्याचे उपकार आणि मायमातीचे संस्कार कायम लक्षात ठेऊन गुणवत्तेची कास धाराअसा संदेश दिला. प्रमुख अतिथि श्री नदाफ सर,श्री साळुंखे सर तसेच मुख्याध्यापिका सौ. पाटील मॅडम व मुख्याध्यापक श्री हडपद सर यांनी दहावी विध्यार्थ्यांना निरोप व बोर्ड परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यानंतर वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात पार पडला. सर्व परितोषके व शैक्षणिक साहित्य अध्यक्षा सौ. भांजे मॅडम यांनी उपलब्ध करून दिले तर कै. अनुराधा श. साळुंखे मॅडम यांच्या स्मरणार्थ बक्षिसे व गरीब होतकरू विध्यार्थी शैक्षणिक खर्च करण्याचे श्री साळुंखे सरानी जाहीर केले. चित्रकला परीक्षा व प्रमाणपत्र निर्मितीसाठी श्री कोतले सर, श्री प्रधान सर व श्री बनसोडे सर यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन श्री बनसोडे सर, श्री प्रधान सर व पारितोषिक वितरण संचलन श्री भालके सर तर आभार श्री नेल्लुरे सर, श्री राठोड सर यांनी मांडले. मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. स्नेह भोजनाने कार्यक्रमाची संगता करण्यात आली.

आजचं शिक्षण, उद्याचं भविष्य; आव्हानात्मक पालकत्व

प्रा. रफीक शेख यांचे प्रतिपादन

# पालकांनी मुलांच्या पावलांसमोर प्रकाश ठेवावा, सावल्या नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन संचलित 'श्रीराम क्लासेस, निफाड' तर्फे विविध स्तरावरील शालेय स्पर्धा परीक्षा मध्ये घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव, बक्षीस वितरण कार्यक्रम आणि शिक्षक सत्कार सोहळा.शिवनेरी लॉन्स निफाड येथे नुकतेच संपन्न झाला असून या निमित्ताने पालकांच्या संवाद सत्रात परभणी येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यार्थी फाउंडेशनचे विद्यार्थीमित्र प्रा. रफीक शेख (करिअर मार्गदर्शक) यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन मुलांना व पालकांना लाभले, त्यांनी उपस्थित पालकांचं प्रबोधन केले.

या कार्यक्रमात आई-बाबा, मला शिकायचंय या पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य .वि. दा .व्यवहारे -विश्वस्त न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आले या पुस्तकाचे संपादन श्रीराम क्लासेस चे संचालक .उल्हास पाटील व.सविता पाटील यांनी केले. असून पुस्तक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे , विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देणारे आहे.या प्रसंगी विद्यार्थी मित्र प्रा.रफीक शेख. आपल्या मनोगतात म्हणाले की



शिक्षण ही कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक शिक्षणाच्या चौकटी मोडून नवनवीन शिक्षणपद्धती उदयास येत आहेत. अशा परिस्थितीत पालकांची भूमिका केवळ मार्गदर्शकाची न राहता ती अधिक आव्हानात्मक बनली आहे.

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित राहिलेले नाही. मुलांना तांत्रिक कौशल्ये, संवादकौशल्य, निर्णयक्षमता आणि जीवन कौशल्ये शिकवणे तितकेच महत्त्वाचे बनले आहे. त्यामुळे पालकत्व अधिक जबाबदारीचे आणि आव्हानात्मक ठरत आहे.

पूर्वी शिक्षण म्हणजे शाळा-महाविद्यालयीन अभ्यासक्रम, परीक्षा आणि पदवी मिळवणे असे गणले जात असे. मात्र, आता शिक्षण बहुपर्यायी झाले आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन कोर्सेस, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), आणि व्यवसायिक कौशल्यांचे महत्त्व वाढले आहे. भविष्यातील नोकऱ्या आणि संधींसाठी पारंपरिक शिक्षण पुरेसे ठरणार नाही....

आजच्या शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये उद्याच्या भविष्याची हमी देऊ शकतात. म्हणूनच, पालकांनी केवळ शैक्षणिक यशावर भर न देता मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिल्यासच त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.असे मोलाचे मार्गदर्शन केले

शिक्षण हा केवळ ज्ञान मिळवण्याचा मार्ग नाही, तर जीवनाचा पाया मजबूत करण्याचा मार्ग आहे. यशस्वी पालकत्व हे केवळ मुलांना चांगल्या शाळेत घालण्यापुरते मर्यादित नसून, त्यांना विचारशील, संवेदनशील आणि सक्षम व्यक्ती बनवण्याची जबाबदारी पालकांची आहे. मुलांचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर आजच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे,कारण सुशिक्षित पिढी म्हणजे प्रगत समाजाची खरी ताकद आहे असं त्यांनी शेवटी स्पष्ट केलं.

ह्या कार्यक्रमात निफाड नगर पंचायत च्या नगराध्यक्षा डॉ कविता धारराव नगराध्यक्षा , उप नगराध्यक्ष अनिल पा. कुंदे - , , वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ निकम ,वि. दा.व्यवहारे कार्यकारी विश्वस्त, तात्यासाहेब वडघुले सचिव , जेउघाले , ज्योती बागडे मुख्याध्यापिका ,प्रसन्ना कुलकर्णी मुख्याध्यापक, दिगंबर पाटील अध्यक्ष - निफाड एज्युकेशन तसेच निफाड एज्युकेशन फाउंडेशन चे सर्व कार्यकारी सदस्य , पत्रकार- राजेंद्रजी थोरात ,मंगेश देवडे (जलसंधारण अधिकारी- नाशिक) , फैजल पटेल -दीप एज्युकेशन यांच्या सहआदी मान्यवर यावेळी उपस्थित होते... कार्यक्रमाचं नियोजन आणि आयोजन श्रीराम क्लासेसच्या वतीने करण्यात आलं होतं.